# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/07/2023 (मंगळवार) दुपार

## चोरी

**१) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर रामटेक बसस्थानक आउटर गेट पोलीस ठाणे रामटेक येथे दिनांक २८/०६/२०२३ चे १५.५० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— लक्ष्मण गजाननराव आगलावे, वय ६३ वर्ष रा. सी पी ॲन्ड बेरार कॉलेज जवळ डांगे बिल्डींग मागे तुळशिबाग पोलीस ठाणे कोतवाली नागपुर कोतवाली नागपुर शहर हा त्यांची पत्नी नामे — छाया लक्ष्मण आगलावे, वय ५८ वर्षे हिचेसह फिर्यादीचे नातेवाईकाच्या लग्नाला राहते घरून जात असतांनी फिर्यादीच्या पत्नीने तिचे जवळचे सोन्याचे दागीने त्यामध्ये एक सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याचे रिंग आणि कॅश १२००/—रू हे तिच्याजवळ असलेल्या निळया रंगाच्या हॅन्डबॅग मध्ये आतील कप्प्यात ठेवले व दोघेही नंतर सकाळी ०८.०० वा. चे दरम्यान रामटेक करीता बसस्थानक गणेशपेठ येथे निघाले. रामटेकला टक्कामोरे सेलीब्रेशन हॉल, रामटेक येथे लग्नाकरीता हजर झाले. लग्न आटोपल्यानंतर त्याच दिवशी दुपारी अंदाजे ०३.३० वा. चे दरम्यान लग्न हॉल येथुन रामटेक बसस्टॅड करीता निघाले दोघेही ०३.४५ वा. चे दरम्यान रामटेक बसस्थानक येथे पोहचले तेव्हा दुपारी ०३.५० वा. रामटेक वरून नागपूरला जाणारी बस ही बसस्थानकाचा आऊटर येथे आली बस मध्ये चढत असतांनी त्यामध्ये खुप गर्दी होती नंतर बस मध्ये आत प्रवेश केला असता थोड्या अंतरावरती बस मधील दोघा अज्ञात पुरुषांनी बस थांबवायला लावली व ते दोन अज्ञात व्यक्ती हे बसमधुन उतरले. ते दोघे अंदाजे ३५ ते ४० वर्ष वयोगटातील होते त्यापैकी एकाने अंगात पिवळया रंगाची टि शर्ट व काळया रंगाची पॅट घातली होती व दुसऱ्याने पाढऱ्या रंगाचा शर्ट घातला होता नंतर फिर्यादी गणेशपेठ बसस्थानक नागपूर येथे उतरून ऑटोने सायंकाळचे ०६.०० वा. दरम्यान घरी पोहचले. फिर्यादीच्या पत्नीने घरच्या कुलुपाची चावी काढण्याकरीता तिच्या जवळील बॅग उघडली असता तिचे बॅगमध्ये सोन्याचे दागीने व रोख १२००/—रू. नव्हते व आतिल पॉकीटची चैन ही उघडी होती. नंतर दुसऱ्या दिवशी दिनांक २९/०६/२०२३ रोजी परत रामटेक येथील पोलीस ठाणेला तक्रार देण्यासाठी गेले असता तेथील पोलीसांनी बसस्थानक येथील सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता बसमध्ये चढतांनी गर्दी होती व नंतर बस सुटल्यावरती दोन अनोळखी संशयीत इसम हे उतरतांनी दिसुन आले. दोन अनोळखी संशयीत इसम यांनी फिर्यादीच्या पत्नीचे दागीने तिने ठेवलेल्या निळया रंगाचा हॅन्डबॅग मधुन १) एका काळया मण्याचा पोतमध्ये १२ सोन्याचे मनी व एक पदक वजन अंदाजे १२ ग्रॅम किंमती अंदाजे ७२,०००/— रू २) कानातले दोन सोन्याचे रिंग वजन ०६ ग्रॅम महागडे किंमती अंदाजे ३६०००/—रू ३) नगदी रुपये ज्यात दोन ५००/—रू. दराची व दोन १००/—दराच्या नोटा १२००/—रू असा एकूण १,०९,२००/— रुपयाचा मुद्देमाल बसस्थानक रामटेक येथील बसमध्ये चढलेल्या व नंतर थोड्या अंतरावर उतरलेल्या दोन अनोळखी संशयीत इसमांनी चोरून नेले आहेत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक मंगेश सोनटक्के ब. नं. रा. पोस्टे रामटेक मो. क्र. ९७६७३३१३५६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत डुमरी चौक, कन्हान येथे दिनांक २१/०७/२०२३ चे ०३.०० वा. ते दिनांक २४/०७/२०२३ चे १०.०० वा पर्यंत यातील फिर्यादी नामे– शिवम विरबहादुर सिंग, रा. हाउस नं ५३ प्लॅट नं. १०३/१०४ काटोल बायपास कन्हान हा इंटरग्रेटेड लॉजिस्टिक प्रायवेट लिमीटेड कंपनी हरिद्वार मध्ये मुद्देमाल लोड करून हैदराबाद येथे नेण्याकरीता निघाला फिर्यादी याने गाडी चेक केली असता त्या गाडीमधील बॉक्स मधील १३० बॉक्स हे कमी होते व सिल तोडलेले २७२६ होते कोणीतरी अज्ञात चोराने गाडीच्या दरवाज्याचे सिल तोडुन आत मधील १३० बॉक्स किंमती अंदाजे १७५०००/–रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्रावणकर ब. नं. ६७५ मो. नं. ९८२३२०३९०६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**